श्री.संदीप पाटील यांना विद्युत निरीक्षणालयातील मुख्य अभियंता (विद्युत) या तात्पुरत्या पदावर वर्ग करण्याबाबत तसेच मुख्य विद्युत निरीक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग
शासन आदेश क्र. मुविनि-२०२६/प्र.क्र. १३९/ऊर्जा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २७ ऑगस्ट, २०२६.

<u>संदर्भ:-</u> १. उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. मुविनि-२०१५/प्र.क्र.२२/ऊर्जा-५, दि.१०.०८.२०१८
२. उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन आदेश क्र. मुविनि-२०२२/प्र.क्र. १७० (भाग-१)/ऊर्जा-१, दि.०३.०२.२०२३.
३. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. ईएसटी २०२२/प्र.क्र.८२/प्रशासन-१, दि.०५.०२.२०२४.
४. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. ईएसटी २०२२/प्र.क्र.८२/प्रशासन-१, दि.०३.०६.२०२५.
५.उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्र. मुविनि-२०२३/प्र.क्र.०९/ऊर्जा-१, दि.२९.०६.२०२६.
६. मा. मुख्य सचिव यांच्या दि.०८.०७.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना:-</u>

संदर्भाधीन क्र. २ येथील शासन आदेशान्वये सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत श्री. संदीप अरविंद पाटील, मुख्य अभियंता (विद्युत) यांच्याकडे मुख्य विद्युत निरीक्षक, ऊर्जा विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला.

०२. संदर्भाधीन क्र.४ येथील आदेशान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाने सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने श्री. संदीप पाटील यांचे ऊर्जा विभागात समावेशन केले. सदर समावेशनाबाबत निर्माण झालेल्या पेचाच्या अनुषंगाने, मा.मंत्रिमंडळाने दि.२६.०२.२०२६ रोजीच्या बैठकीत श्री. पाटील यांचे ऊर्जा विभागात समावेशन करण्याकरिता मुख्य अभियंता (विद्युत) या संवर्गात १ तात्पुरते पद निर्माण करण्यास मान्यता दिली आहे.

०३. मा. मंत्रिमंडळाने दि.२६.०२.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.५ येथील दि.२९.०६.२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार निर्गमित केलेल्या आकृतीबंधामध्ये विद्युत निरीक्षणालय शाखेमध्ये (एस-२९: १३११००-२१६६००) या वेतनश्रेणीमध्ये २ पदे उपलब्ध झाली आहेत. त्यानुषंगाने प्रशासकीय निकड विचारात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश:-

उपरोक्त नमूद प्रस्तावनेच्या अनुषंगाने, ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालय शाखेतील श्री. संदीप अरविंद पाटील, मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या पदस्थापनेत आंशिक बदल करुन त्यांना मुख्य अभियंता (विद्युत) (एस-२९: १३११००-२१६६००) या तात्पुरत्या पदावर वर्ग करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

०२. तसेच, विद्युत निरीक्षणालय शाखेच्या प्रशासकीय कामकाजाची निकड विचारात घेता श्री. संदीप पाटील यांच्याकडे या आदेशाद्वारे मुख्य विद्युत निरीक्षक (एस-२९: १३११००-२१६६००) या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात येत आहे.

०३. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८२७१९१३२००५५३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVINASH RAJESH ATKAD

Digitally signed by AVINASH RAJESH ATKAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=F772EE0A28E62B88C18153A71C018DB8CA85BB885 19F9C9732879CD03483D005, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7DFB83DE598E6DA39C6F3759E6943FB26400 3EB8BAFCBA24102A6D87367C3EA1, cn=AVINASH RAJESH ATKAD
Date: 2026.08.27 19:16:02 +05'30'

(अविनाश रा. आतकड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मुख्य विद्युत निरीक्षक, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पू.) मुंबई.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) ½ महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
३) श्री. संदीप अरविंद पाटील (यांना विहित मार्गाने)
४) अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/निवासी लेखाधिकारी, मुंबई.
५) अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई/पुणे/छ. संभाजीनगर/नागपूर.

प्रत:

१) मा. मुख्यमंत्री (ऊर्जा) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४) सहसचिव (ऊर्जा-१), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५) निवडनस्ती (ऊर्जा-१).